# ८. परिशिष्टे


| अ.क्र. | | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ८.१ | : | माणदेशाचे चित्रण करणारे मराठी कथासंग्रह | ४३२ ते ४३२ |
| ८.२. | : | माणदेशाचे चित्रण करणाऱ्या मराठी कादंबऱ्या | ४३३ ते ४३३ |
| ८.३. | : | माणदेशी साहित्यिक द. ता. भोसले ह्यांची मुलाखत | ४३४ ते ४३८ |
| ८.४. | : | माणदेशाचे नकाशे : | |

- महाराष्ट्र राज्यातील माणदेश स्वरुप व स्थान
- माणदेश : गावे, शहरे, तालुके विभागणी
- सातारा, सांगली व सोलापूरमध्ये विभागलेला माणदेश
- माणदेश : माणगंगा नदीचा जलप्रवाह
- मध्ययुगीन व अर्वाचीन काळातील माणदेश

## परिशिष्ट क्रमांक : १

### ८.१. माणदेशाचे चित्रण करणारे मराठी कथासंग्रह :

सूचना :- १. सदर परिशिष्टातील नोंदी कालानुक्रमे आहेत.

२. कथासंग्रहाचे प्रकाशनवर्ष हे प्रथमावृत्तीचे आहेत.

१. 'उपेक्षितांचे अंतरंग', श्री. म. माटे, आर्यभूषण, पुणे, १९४१.
२. 'झुंज', म. गो. पाठक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९६०.
३. 'लागीर', म. गो. पाठक, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९८४.
४. 'अवलिया', म. गो. पाठक, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९८५.
५. 'आंदण', उत्तम बंडू तुपे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९८६.
६. 'वाजाप', रमेश जावीर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९८७.
७. 'पिंड', उत्तम बंडू तुपे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९८७.
८. 'गोतावळा', अज्ञानबाबू, चांगुणा प्रकाशन, दिवड (सातारा) १९८७.
९. 'माणदेशी कथा', संपा. सयाजीराजे मोकाशी व प्राचार्य विश्वासराव देशमुख, आनंद प्रकाशन, फलटण, १९९०.
१०. 'कोंबारा', उत्तम बंडू तुपे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९१.
११. 'माती आणि माणसं', उत्तम बंडू तुपे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९३.
१२. 'गावरंग', कृष्णा इंगोले, प्रियदर्शिनी प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.
१३. 'अंधार', वामन जाधव, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.
१४. 'धगाटा', तानाजीराव वाघमारे, प्रा. टी. ए. चव्हाण (माडगुळे), १९९९.
१५. 'सोंग', भास्कर बंगाळे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९९९.
१६. 'आक्रोश', वामन जाधव, मनोकामना प्रकाशन, इस्लामपूर, २०००.
१७. 'हराटीची भुई', सुनील दबडे, प्रियदर्शिनी प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
१८. 'भिरुड', हरी भोसले, स्त्री विद्या प्रकाशन, परभणी, २००५.

## ८.२. माणदेशाचे चित्रण करणाऱ्या मराठी कादंबऱ्या :

सूचना :- १. सदर परिशिष्टातील नोंदी कालानुक्रमे आहेत.

२. कादंबरीचे प्रकाशनवर्ष हे प्रथमावृत्तीचे समजावे.


१. 'ओंकार', भीमराव कुलकर्णी, दत्त प्रकाशन, पुणे, १९६८.

२. 'झावळं', उत्तम बंडू तुपे, मेहता पब्लिकेशन्स्, पुणे, १९८४.

३. 'इजाळं', उत्तम बंडू तुपे, मेहता पब्लिकेशन्स्, पुणे, १९८४.

४. 'झुलवा', उत्तम बंडू तुपे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८६.

५. 'राजपुत्र', म. गो. पाठक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८७.

६. 'खाई', उत्तम बंडू तुपे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८८.

७. 'कळाशी', उत्तम बंडू तुपे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९८८.

८. 'चिपाडं', उत्तम बंडू तुपे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९.

९. 'खुळी', उत्तम बंडू तुपे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९१.

१०. 'शेवती', उत्तम बंडू तुपे, शशिदीप प्रकाशन,पुणे, १९९१.

११. 'भस्म', उत्तम बंडू तुपे, मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई, १९९१.

१२. 'नाक्षारी', उत्तम बंडू तुपे, शशिदीप प्रकाशन,पुणे, १९९३.

१३. 'माणमाती', शहाजीराव भानुदास बळवंत, उत्कर्ष प्रकाशन,पुणे, २००६.

## ८. ३. माणदेशाचे चित्रण जाणून घेण्यासाठी द. ता. भोसले ह्या माणदेशी साहित्यिकाची घेतलेली मुलाखत :

प्रश्न १. आपले शालेय शिक्षण कोठे व कसे झाले ?

⇨ माझे शालेय शिक्षण सरकोली, ता. पंढरपूर या जन्मगावी झाले. माध्यमिक शिक्षण सांगोला येथे तर महाविद्यालयीन (पदवीपर्यंत) संगमेश्वर कॉलेज, सोलापूरला झाले. घरची परस्थिती हलाखीची होती. त्यातच वयाच्या ११/१२ व्या वर्षी शेतमजूर असलेले आईवडिल वारल्याने, नानाविध कामे करीत, अनेक संकटांशी सामना करीत शिक्षण पूर्ण केले. त्यावेळी काही शिक्षकांची व वर्गमित्रांचीही मला मदत झाली.

प्रश्न २. आपण लेखनाकडे कसे वळलात ?

⇨ वाचनाची जात्याच आवड असल्याने व पोरकेपणाने निर्माण झालेले रितेपण कमी होण्यासाठी वाचन लेखनाकडे वळलो. त्यातूनच आपणाजवळ असलेल्या अनुभवास व्यक्त करावे असे वाटल्याने साहित्यनिर्मितीकडे वळलो. ग्रामीण जीवन, ग्रामसंस्कृती हा माझ्या लेखनाचा प्रधान विषय असतो.

प्रश्न ३. माणदेशाने आपणाला साहित्यिक बनवले काय, ह्यासंदर्भात आपण माणदेशाचा वेगळेपणा कोणता सांगाल ?

⇨ माणदेशांची भूमी निसर्गसौंदर्याने नटलेली नाही. हा तसा दुष्काळी भाग, त्यामुळे येणाऱ्या संकटाशी झगडणे, जगण्याच्या लढाईत माघार न घेणे; इथल्या दारिद्र्याचा स्वीकार करणे हे या प्रदेशाने माणसांना शिकविले आहे. माळरानाची भूमी, समृद्धीचा अभाव, बागायती शेती कमी, पोटासाठी शहरांचा आश्रय घेणे, या प्रदेशातील उत्पन्नावर गृहोद्योग चालविणे अशी जीवनशैली माणदेशी माणसाची निर्माण झाली. चिवटपणा, जिद्द आणि संघर्ष हे या मातीने दिलेले गुणविशेष म्हणता येतील.

प्रश्न ४. माणदेशातील देवदेवस्की पाहता ह्या लोकांच्या मानसिकतेचे विश्लेषण कसे करता येईल ?

⇨
- बेभरवशाचा निसर्ग
- दुष्काळाचे वारंवार येणारे सावट

- त्यातून निर्माण झालेली जीवनाची अस्थिरता

आणि ती कमी होण्यासाठी माणूस नकळत देवदेवतांची सकाम पूजा करतो.आपलं संकट निवारण्यासाठी देवाला साकडं घालतो. शिवाय अज्ञान, निरक्षरता यामुळेही अंधश्रद्धा निर्माण होतात.. सकाम देवतांची कर्मकांडात्मक पूजा केली जाते. या देवताचे जे भगत, देवर्षी असतात त्यांना मानण्याची कृती तयार होते. त्याला काही अपरशक्ती प्राप्त झाली आहे असे मानले जाते अन् सामान्य माणूस आपल्या अस्थिर आपत्तीग्रस्त जीवनात आधार शोधण्यासाठी याचा आश्रय घेतो. माणदेशात इतर भागाप्रमाणे देवदेवस्कीचे प्राबल्य आहे. आता ते कमी होत चालले आहे.

प्रश्न ५. माणदेशात आज जातीयता टिकून आहे का ?

⇨ जात काही विशिष्ट भूभागामुळे निर्माण झालेली नाही. सर्व भारतभर ती खोल रुतून बसलेली आहे. विज्ञानप्रचार, शिक्षणप्रसार, आधुनिकीकरण शहरीसंपर्क यामुळे तिची तीव्रता कमी झाली असली तरी ती टिकून राहिली आहेच.

प्रश्न ६. माणदेशात अंधश्रद्धा जोपासल्या जातात का ?

⇨ होय. परंपराप्रियता आणि परिस्थितीचा परिपाक येथेही आहेच की !

प्रश्न ७. सवर्णांकडून गरिबांना व दलितांना वागणूक कशी मिळते ?

⇨ आता गेल्या ५०-६० वर्षांपूर्वी जशी अस्पृश्यता होती तशी राहिली नाही. आता सवर्णाबरोबर अस्पृश्य (मागास) वर्गातील माणूस एकत्र राहतो. स्पर्श करतो. एकत्र जेवतो. शिवाशिव पाळत नाही. कडक निर्बंध लादत नाही. पण बेटीव्यवहार आणि काही गावात मंदिरप्रवेश याबाबतीत अजून समानतेची, मानवतेची, बंधुत्वाची वागणूक आढळत नाही. दोन भिन्न जातींचा विवाह सर्रास होत नाही. कुणाचा प्रेमविवाह झाला तर ती गोष्ट वेगळी.

प्रश्न ८. माणदेशातील स्त्रियांचे जीवन अपमानकारक आहे का ?

⇨
- अपमानकारक म्हणता येणार नाही पण - त्याना निर्णयाचे स्वातंत्र्य नसते.
- ते सहजीवन नसते.
- कष्टप्रद असते.
- पुरुषी संस्कृतीचा वरचष्मा असलेले असते.

- स्त्रियांना खेड्यात अजूनही दुय्यम स्थान दिलेले आढळते.

प्रश्न ९. आपल्या कथात्मक साहित्यातून ज्या प्रथा - परंपरांचा उल्लेख येतो, त्यात वास्तवाचा भाग किती आहे ?

⇨ समाजजीवनात लेखक म्हणून ज्या अनिष्ट प्रथा - परंपरा जाणवल्या त्यांचा मी वास्तववादी स्वरुपातच आविष्कार केलेला आहे. प्रथा - परंपरांचा वेध कल्पिताच्या आधारे घेताच येत नाही.

प्रश्न १०. माणदेशी प्रदेश वैशिष्ट्यांनुसार तेथील माणसांना क्षुद्र व खुजी म्हणता येईल का ?

⇨ अजिबात नाही. प्रादेशिक वैशिष्ट्यामुळे माणूस क्षूद्र बनत नसतो. वृत्तीमुळे संस्कारांमुळे त्याच्या वर्तनावर परिणाम होत असतो. शिक्षणाच्या अभावातूनही हे घडू शकते.

प्रश्न ११. माडगूळकरबंधूंनी केलेल्या माणदेशी चित्रणाविषयी आपले मत काय ?

⇨
- वास्तववादी आहे.
- सहृदयतेने केलेले आहे.
- ते कलात्मक उंची गाठलेले आहे.
- समाजाच्या सर्व स्तरांचे दर्शन घडविणारे आहे.
- त्याद्वारे मानवीजीवनाचा अनोखा साक्षात्कारही झालेला आहे.

वाचकप्रियता खूप लाभलेली आहे.

प्रश्न १२. आपल्या माणदेशी कथेत 'दुष्काळ' व 'भूक' हे आपल्या चित्रणाचे विषय दिसतात. ह्याबद्दल आपले मत काय ?

⇨ माणदेशाचे अविभाज्य अंग दुष्काळ असेल तर त्यामुळे माणसाला गिळणारी भूक हा लेखनाचा विषय न झाला तर नवलच ! इथल्या माणसाला मुलभूत गरजांसाठीच लढावे लागते. अन्नासाठी दाही दिशा भटकावे लागते. आता हे जर या भूभागाचे ठळक, अस्वस्थ करणारे वास्तव असेल तर माझ्या लेखनात ते येणे स्वाभाविक आहे. माडगूळकर बंधुच्या साहित्यातही हेच दिसून येईल.

प्रश्न १३. 'इथे फुलांना मरण जन्मता' ह्या कादंबरीत माणदेशी वातावरणाचा परिणाम जाणवतो, ह्याविषयी आपले मत काय ?

⇨ या कादंबरीतील वातावरण खास माणदेशी असे म्हणता येणार नाही. ते कुठल्याही भूभागातील असू शकते. कोणत्याही समाजात घडू शकते. खरा धर्म आणि आपल्या आयुष्यात त्याला असणारे स्थान कोणते, हा मूलभूत प्रश्न या कादंबरीतून मी व्यक्त केला आहे.

प्रश्न १४. एकंदरीत आजच्या माणदेशी चित्रणाविषयी काय म्हणता येईल ?

⇨ आजही काही मोजके लेखक माणदेशाचे चांगले चित्रण करीत आहेत. त्यात कसदारपणा आहे. त्यात माणदेशाशी व कलेशी असणारी अविकृत निष्ठाही पाहावयास मिळते.

प्रश्न १५. बाळूच्या बापाला माणदेशी माणसाचा प्रतिनिधी म्हणता येईल का ?

⇨ येथल्या माणसाला जगण्यासाठी पदोपदी लढाई करावी लागते. कुठल्याही परिस्थितीत टिकून राहणे एवढेच त्यांचे जीवनध्येय असते. त्यामुळे कोणी काबाडकष्ट करीत जगेल. बाळूचा बाप चलाख बुद्धीचा असल्याने, माणसांचा कमकुवतपणा ओळखत असल्याने त्यांचा फायदा घेऊन फारसे कष्ट न करता जगतो. अशी माणसे माणदेशात नक्कीच आढळतात.

प्रश्न १६. 'मी आणि माझा बाप' मधील तानी हे माणदेशाचे वास्तव म्हणावे का ?

⇨ होय. माणदेशाप्रमाणे सगळ्याच भूभागात 'तानी' असतात - असू शकतात.

प्रश्न १७. आपल्या कथेची व कादंबरीची कथानके कौटुंबिक संघर्षाभोवतीच फिरताना दिसतात, ह्यासंदर्भात आपले मत काय ?

⇨ १. एक तर खेड्यात उद्योगधंदे नाहीत व कारखानदारी नाही. (पूर्वीच्याकाळी तरी)

२. माणसांच्या जगण्यामरण्याचे प्रश्न भूमीशी, कुटुंबाशी आणि गावाशी निगडित होते. स्वाभाविकच माणदेशचा माणूस चित्रित करताना त्याची सुखदुःखे मांडताना वर सांगितलेल्या तीन बाबी येणारच !

प्रश्न १८. नवीन माणदेशी लेखकांना कोणता संदेश देऊ इच्छिता ?


⟹ • सूक्ष्म निरीक्षणातून माणदेशाचा आलोक घ्या.
• त्यातील परिवर्तनाचा मागोवा घ्या.

त्याची कारणमीमांसा पाहता आली तर पहा. आणि त्यातून निर्माण झालेले व्यक्तीजीवन ! समाजमन वास्तवतेने पण कलात्मक नजरेने शब्दांकित करा.


प्रश्न १९. भविष्यात माणदेशावर आपण काय लिहित आहात ?

⟹ लोकजीवन व माणदेशातील लोकसंस्कृती यावर काही लेखन करता आले तर बघणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील माणदेशाचे स्वरुप व स्थान




# माणदेश : गांवे, शहरे, तालुके विभागणी





**खुलासा**

| | |
|---|---|
| माण तालुका – | ९१ गांवे |
| आटपाडी तालुका – | ६० गांवे |
| जत तालुका – | ३१ गांवे |
| कवठेमहांकाळ-तालुका – | १४ गांवे |
| सांगोला तालुका – | ८१ गांवे |
| मंगळवेढा तालुका – | २२ गांवे |
| पंढरपूर तालुका – | १२ गांवे |

# सातारा, सांगली व सोलापूरमध्ये विभागलेला माणदेश





माणदेश : माणगंगा नदीचा जलप्रवाह
पुणे जिल्हा
सातारा जिल्हा
सोलापूर जिल्हा
सांगली जिल्हा
निरा खोरे
भीमा खोरे
भीमा नदी
पंढरपूर
राजेवाडी तलाव
माण नदी
कुळकजाई
सांगोले
अपुपा नदी
बालतीर नदी
बेलवण नदी
कोरडा नदी
बुध्दीहाळ तलाव
पारे तलाव
वैरळा नदी खोरे
खानापूर तालुका
मंगळवेढा तालुका
दोड्डा नाला खोरे
क. महांकाळ तालुका
खुलासा
माणदेशाची सीमा
माणगंगा नदी प्रवाह
उपनद्या / ओढे
मोठी शहरे
उ
प
पू
द

# मध्ययुगीन व आर्वाचीन काळातील माणदेश

